**श्री.अजयकुमार नष्टे,उपविभागीय अधिकारी, जत उपविभाग जत यांचे न्यायालयात....**

दुरध्वनी क्रं. 02344/246134 Email-sdojath5@gmail.com

क्र.आरटीएस/अपील/१९०/२०२३

दिनांक ३१.०१.२०२५

**प्रति,**

१. कृष्णाबाई संतु उर्फ संतराम धाकटे उर्फ सन्नके
रा. उमराणी, ता. जत, जि. सांगली ......... **अपिलार्थी**

**विरुध्द**

१. पुतळाबाई संतु उर्फ संतराम धाकटे उर्फ सन्नके
२. धानाप्पा संतु उर्फ संतराम धाकटे उर्फ सन्नके
३. संगीता अंकेश माने
४. वैशाली उर्फ बाळाबाई कुमार बामणे

अ.क्र.१ व २ रा.अरकेरी ता.विजयपुर जि. विजयपूर राज्य कर्नाटक
अ.क्र.३ रा. बसाप्पाचेवाडी, कोकळे ता.क.महांकाळ जि.सांगली
अ.क्र.४ बसर्गी ता.जत जि.सांगली ....... **जाबदार**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ प्रमाणे**

**निकालपत्र**

मौजे उमराणी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर १०९९, प्रकरणी तहसिलदार जत यांनी क्र.हनो/वाटप/एसआर-२२६/२०१८ दिनांक १५.०६.२०१८, रोजी दिलेला वाटप आदेश व सदर वाटप आदेशाचे अनुषंगाने मंडळ अधिकारी,जत यांनी फेरफार नंबर ८०५७, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपील दाखल केलेले आहे.

**प्रस्तुत अपील कामी उभय पक्षकार यांना म्हणणे मांडणेसाठी रितसर नोटीसा देऊन सुनावणीसाठी पुरेशी संधी देण्यात आली आहे.**

**अपिलार्थी यांनी आपले अपील अर्जामध्ये सारांशरूपाने पुढीलप्रमाणे मुद्दे मांडले आहेत.**

१. वाद मिळकत अपिलार्थी यांची आई मुक्ताबाई रामु अभंगे यांच्या पासुन आलेली मिळकत आहे. संतु उर्फ संतराम गंगाराम धाकटे उर्फ सन्नके यांचे अपिलार्थी पहिली धर्मपत्नी आहे. संतराम उर्फ संतु यांच्या पासुन अपिलार्थी याना मुलबाळ झाले नाहीत. जाबदार १ हि संतु उर्फ संतराम यांचे दुसरी पत्नी असुन, जाबदार नंबर - २ हा जाबदार नंबर १ यांचा मुलगा आहे. वाद मिळकत अपिलार्थी हिचे स्वसंपादीत मिळकत आहे. सदर मिळकतबाबत जाबदार कसलाही हक्क संबध नव्हता व नाही.

२. वाद मिळकत अपिलार्थी यांचा स्वसंपादीत मिळकत असल्याने असा बोगस वाटपत्र करता येत नाही. अपिलार्थी हि कधी हि व केव्हाही तहसिलदार, जत यांचे समोर जबाब नोंदवला नव्हता व नाही. अपिलार्थी हि अशिक्षीत, अनाडी, बोळसट व कायदेचा ज्ञान नसलेली विधवा महीला आहे. वाद मिळकत व्यतरीकत अपेलंट याना जगणेचा साधन नाही. जाबदार नंबर १ व २ यानी अपेलंट यांचा मिळकत हडप करणेचा दृष्ट हेतूने बोगस व बेकायदेशिर वाटप दस्त करुन तहसिलदार, जत याना फसवणूक करून आदेश पारीत करुन घेतले आहेत. सदर आदेशास अपील करण्यास कारण घडले आहे.

३. अपिलार्थी यांना वाद मिळकत आपल्या जनक आई कडून वारसाने मिळालेली मिळकत असल्याने, सदर मिळकत वाड वडीलार्जीत मिळकत नाही. सदर मिळकत अपिलार्थी याना आपल्या माहेरकडून मिळालेली आहे. जाबदार यानी अपिलार्थी यांचा हक्क व अधिकार उडवणे करीता तहसिलदार यांचे समोर बोगस अर्ज दाखल करून, बोगस वाटप केले आहेत. सदरबाब अपिलार्थी याना कल्पना असताना देखील

जाणून बुजून अपिलार्थी याना मानसिक, शारिरीक व आर्थिक त्रास देणेचे हेतुने वरील आदेश करुन घेतले आहेत. जाबदार नंबर १ व २ यानी बोगस कगदपत्रे तयार करुन वाटप दस्त करुन तहसिलदार, जत. ता जत. जि सांगली यानी क्र./हनो/वाटप/एस.आर./२२६/२०१८ चे दिनांक १७.०६.२०१८ रोजी आदेश पारीत करुन घेतले आहेत. सदर आदेश संपूर्णपणे बेकायदेशिर आहे. अपिलार्थी याना कोणताही व कसलाही नोटीस न देता वरील आदेश पारीत करुन घेतले आहे. मे. तहसिलदार, जत. ता जत. जि सांगली यानी क्र.हनो/वाटप/एस.आर./२२६/२०१८ चे दिनांक १७.०६.२०१८ रोजी आदेश पारीत केले आहे. सदर वाटप आदेशास नाराज होवुन अपिलार्थी यानी प्रस्तुतचे अपिल दाखल केले आहे.

४. तहसिलदारसो जत कोर्टानी वाटपा कामी अपिलार्थी याना नोटीस दिले नव्हते व नाही. तसेच सदर निकाल झाल्या नंतर अपिलार्थी याना नोटीस दिले नव्हते व नाही. तहसिलदार जत कोर्टानी निकाल देणे पूर्वी वाद मिळकतीबाबत कायदेशिर वारसाबाबत कागदपते नपाहता बेकायदेशिरपणे वाटप आदेश पारीत केले आहे तो संपूर्णपणे हिंदु कायदा, हिंदू वारसा कायदा विरुध्द आहे.

५. वाद मिळकत अपिलार्थी हिचे स्वसंपादीत असल्याने जाबदार नंबर २ यांचा कोणताही व कसलाही हक्क संबध नाही. अपिलार्थी व जाबदार नंबर २ यांच्या मध्ये कधीही व केव्हाही लेखी अथवा तोंडी वाटप झाले नव्हते व नाही. तहसिलदार, जत यांचे कोर्टात दाखल केलेले वाटप पत्र बोगस असुन सदर वाटप पत्र कधी केले व केव्हा केले याबाबत सदर वाटणी पत्रा मध्ये तारीख देखील नमुद नाही. अपिलार्थी यानी कधी हि व केव्हाही रक्कम रुपये १००/- चा स्टॉप पेपर किंवा बॉड आणली नव्हती व नाही. मा. तहसिलदारसो, जत यानी आपल्या आदेशा मध्ये वडीलार्जीत शेत मिळकत नमुद केले आहे. वास्तविक वाद मिळकत अपिलार्थी यांचा स्वसंपादीत मिळकत असल्याने असा बोगस वाटपत्र करता येत नाही. अपिलार्थी हि कधी हि व केव्हाही तहसिलदार, जत यांचे समोर जबाब नोंदवला नव्हता व नाही. अपिलार्थी हि अशिक्षीत, अनाडी, बोळसट व कायदेचा ज्ञान नसलेली विधवा महीला आहे. वाद मिळकत व्यतरीकत अपेलंट याना जगणेचा साधन नाही.जाबदार नंबर १ व २ यानी अपेलंट यांचा मिळकत हडप करणेचा दृष्ट हेतूने बोगस व बेकायदेशिर वाटप दस्त केले आहेत याबाबत तहसिलदार यानी कोणताही व कसलाही कागदपत्रे न तपासता आदेश पारीत केले आहेत.

**जाबदार यांना प्रस्तुत अपिलकामी नोटीसा बजाऊन म्हणणे मांडणेची संधी देऊनही प्रकरणी कोणतेही म्हणणे सामील केलेले नाही.**

**अपिलार्थी यांनी प्रस्तुत अपील कामी दाखल केलेला अपील मेमो, प्रकरणांतील उपलब्ध कागदपत्रे याचे एकत्रीत अवलोकन करता माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत.**

१. मौजे उमराणी, ता. जत, जि. सांगली येथील गट नंबर १०९९, प्रकरणी तहसिलदार जत यांनी क्र.हनो/वाटप/एसआर-२२६/२०१८ दिनांक १५.०६.२०१८, रोजी दिलेला वाटप आदेश व सदर वाटप आदेशाचे अनुषंगाने मंडळ अधिकारी,जत यांनी फेरफार नंबर ८०५७, प्रकरणी दिले आदेशावर व्यथित होऊन प्रस्तुत अपिलार्थी यांनी या न्यायालयात सदरचे अपील दाखल केलेले आहे. प्रस्तूतचे अपिल दाखल करणेस करणेस अपिलार्थी यांना सुमारे ०४ वर्षे ०८ महिने इतका विलंब झालेला आहे. त्याकामी अपिलार्थी यांनी विलंब माफी अर्ज दाखल केला आहे.

२. वाद मिळकत ही अपिलार्थी यांच्या आईकडून वारसाने अपिलार्थी यांना प्राप्त झालेली मिळकत आहे. हिंदू वारसा अधिनियम १९५६ कलम १४ नुसार हिंदू स्त्रीला कोणत्याही मार्गाने प्राप्त झालेल्या मालमत्तेची ती संपूर्ण स्वामीनी असते. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ (२) अन्वये वाटपपत्र हे सहधारकामध्ये वाटप करणे आवश्यक होते. प्रकरणी झालेले वाटप हे सहधारकामध्ये झालेले दिसून येत नाही. त्यामुळे झालेले वाटप हे कायदेशीर नाही.

३. प्रकरणी झालेले वाटप आदेशाचे अवलोकन करता, वाटप आदेशाने अपिलार्थी यांचे मालकीचे क्षेत्र जाबदार २ यांना हस्तांतरीत केलेचे दिसून येते. तयामुळे वास्तविक मालमत्ता हस्तांतरण कायदा व महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम या कायदयाअंतर्गत तरतूदींचा भंग झालेला आहे. त्याचप्रमाणे शासनाचे

मुद्रांक महसूलचे मोठे नुकसान झालेले आहे. या कारणास्तव तहलिसदार जत यांचा आदेश हा पूर्णतः बेकायदेशीर असल्याने तो रदद करणे क्रमप्राप्त ठरून फेरफार नंबर ८०५७ रद्द करणे क्रमप्राप्त ठरणार आहे. यास्तव मी, अजयकुमार नष्टे, उपविभागीय अधिकारी जत, उपविभाग जत पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**निकालपत्रात नमूद कारणास्तव अपिलार्थीचा अपील अर्ज मान्य करण्यात येत आहे व तहसिलदार जत यांचेकडील वाटप आदेश क्र.हनो/वाटप/एसआर-२२६/२०१८ दिनांक १५.०६.२०१८ व फेरफार ८०५७, दिनांक ११.१०.२०१८ रद्द करण्यात येत आहे.**

सदर आदेशाची अंमलबजावणी अपील कालावधीनंतर करणेत यावी.

सदर निकालाची समज सर्व संबंधीताना देणेत यावी.

प्रस्तुत निकालपत्र www.eqjcourts.gov.inया वेबसाईटवर पहाणेस उपलब्ध आहे.

(अजयकुमार नष्टे)
**उपविभागीय अधिकारी**
**जत उपविभाग जत**

ठिकाण -जत
दिनांक -३१.०१.२०२५

प्रत- तहसिलदार, जत यांना माहितीसाठी व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.